# पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०५.०४.२०१७<br>००.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०४.०४.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

पोस्टे वैजापुर गुरन I १३९/१७ कलम ३०२ भादवि मधिल फिर्यादी सरला मुकाराम निघोटे वय ३१ धंदा घरकाम रा. मकरंदपुरवाडी ता. वैजापुर यांनी फिर्याद दिली कि यातील आरोपी बाळासाहेब मुरलीधर अहेर वय ६० व ईतर २ सर्व रा. सदर यातील मयत जखमी वआरोपी यांच्यात झालेल्या भांडणाची तक्रार देणेस पो.स्टेला फिर्यादीचा पती का गेला असे म्हणुन यातील आरोपीतांनी संगनमत करून मयताचे डोक्यात फरशीचा मुकडा मारून जबर जखमी केले व ईतर जखमींना विटांच्या तुकडयांनी मारून जखमी केले असे फिर्यादी वरून गुरन १३९/१७ कलम ३२४ ३२५ ५०४ ५०६ ३४ भादवि प्रमाणे दाखल करून तपास पोह/८७२ वेलगुडे यांच्याकडे देण्यात आला होता.दि.३/४/२०१७ रोजी वैद्यकिय अधिकारी घाटि दवाखाना औरंगाबाद यांना मयताने जबाब नोंदविणे बाबत पत्र दिले असता त्यांनी सदर जखमी हा जबाब देण्याच्या स्थितीत नसल्याने अभिप्राय दिला त्यावरून सदर गुन्हयात दि. ३/४/१७ रोजी कलम ३०७ भादवि प्रमाणे समाविष्ठ करण्यात आला होता. घाटि दवाखाना औरंगाबाद येथुन खबरदेनार एम.ए.तडवी पोह/२७३ घाटि मेडिकल चौकि औरंगाबाद यांनी एमएलसी.नं. ४४६३/६३/एचजेके/२०१७ दि.०२/०४/२०१७ मधील मयत उपचारादरम्यान दि.०४/४/२०१७ १७.४५ वा मरण पावला आहे वगैरे एमएलसी पत्रावरून आज रोजी सदर गुन्हयात कलम ३०२ भादवि समाविष्ठ करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाला असुन अधिक तपास श्री जाधव सपोनि पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

## अकास्मात मृत्यु बाबत.

०१) पोस्टे देवगाव आमृ.नं. १०/१७ कलम १७४ सीआरपीसी मधिल खबर देनार पोह/२७३ एम.ऐ तडवी घाटि मेडिकल चौकि औरंगाबाद यांनी खबर दिली कि यातील मयत – भारती राजेश गायके वय २५ रा. जवळी ता.कन्नड यातील मयत बाई नामे भारती राजेश गायके वय २५ रा. जवळी ता.कन्नड हीने तीच्या राहते घरी दि.०४/०४/२०१७ रोजी १७.३० वा सुमारस घराचे छतास लावलेलया लोखंडी हुकाला दोरीचे साहाययने स्व:चे गळयाला गळफास घेवुन आत्महत्या केली म्हणुन आमृ दाखल झाला असुन अधिक तपास श्रीमती आडे सपोनि पोस्टे देवगाव हे करीत आहे.

०२) पोस्टे वैजापुर आमृ.नं. २९/१७ कलम १७४ सीआरपीसी मधिल खबर देनार वैद्यकिय अधिकारी घाटि दवाखाना औरंगाबाद यानी खबर दिली कि यातील मयत – निकीता संजय माळी वय १५ रा शहाजतपुर ता.वैजापुर यातील खबर देनार यांनी एमएलसी नं. ४५३०/सीडीएस /१७ दि.३/४/१७ वेळ १९.१५ मधील वर नमुद मयत ही पोटात दुखत असल्याने औषधोपचार घेत असतांना मयत झाल्याने आमृ दाखल. झाला असुन अधिक तपास सफौ/ कटकुरी पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

०३) पोस्टे सोयगाव आमृ.नं. ०६/१७ कलम १७४ सीआरपीसी मधिल खबर देनार डॉ.विसपुते सीएमओ सिव्हील हॉस्पीटल जळगाव यानी खबर दिली कि यातील मयत – अमोल हरी ईंगळे वय ३५ रा जरंडी ता. सोयगाव यातील खबर देनार यांनी खबर दिली कि यातील मयत याने काहितरी विषारी औषध सेवन केल्याने त्यास उपचार कामी सिव्हील हॉस्पीटल जळगाव येथे दि. २९/३/२०१७ रोजी १०.२० वा दाखल केले त्याचेवर उपचार चालु असतांना तो दि. ०२/४/१७ रोजी १७.३० वा मयत झाल्याने आमृ दाखल. झाला असुन अधिक तपास पोना/१४०२ तडवी पोस्टे सोयगाव हे करीत आहे.

**मुंबई दारूबंदी कायदा:–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे शिल्लेगाव ला २४ गुन्हा मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे २४ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन १८५८०/–रू. किं देशीदारू भिंगरी संत्राच्या १८० मिलीच्या २८१ बाटल्या व गावठी हातभटटीची दारू १२७७०/रू ची १६५ लीटर व रसायन असा एकुण ३१३५० /रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे गंगापुर ला ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०१ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ७८०/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री सफौ/भुजंगे नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**